| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई विरार यांचे कार्यालय,**<br>**रामनगर, सृष्टी, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे**<br>दुरध्वनीक्रमांक ०२२-२९४५१००१<br>Mail:cpoffice.mb-vv@mahapolice.gon.in | |

**प्रेसनोट क्र ३६०** **दिनांक- २७/१२/२०२१**

## राष्ट्रीय महामार्गावरील सि.सि.टी.व्ही कॅमेरा व इतर साहीत्यांची चोरी करणा-या गुन्हेगारास अटक करुन १,४०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २३/११/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता ते दिनांक १४/१२/२०२१ रोजी १०.०० वा. रोजीचे दरम्यान सातीवली ब्रिज ते पुढे ८०० मीटर अंतरावर मुंबई-अहमदाबाद हायवे रोड वसई पुर्व ता. वसई जि. पालघर येथील सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन उभारलेल्या सि. सि. टि. व्ही. कॅमे-याची वायर व इतर साहीत्य असे एकुण १,४०,०००/- रुपये किंमतीचे मुद्देमाल चोरुन नेले बाबत अज्ञात चोरटया विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.नों.क्र. १४३०/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हयाचे घटनास्थळावरुन मिळालेल्या तांत्रीक गोष्टींचा अभ्यास करुन तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन गुन्हयात आरोपीत नामे - नितीन लाडक्या बोंबाडे वय — २३ वर्षे, रा. मु.पो - घोल, चारोटी टोल नाक्या जवळ, ता. डहाणु, जि. पालघर यास दि. २०/१२/२०२१ रोजी अटक करुन वालीव गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यास विश्वासात घेवुन कौशल्याने तपास केला असता आरोपीता कडुन १,४०,०००/- रुपये किंमीतीचा गुन्हयात चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि./ज्ञानेश फडतरे, पो.हवा./मनोज मोरे, मुकेश पवार, पो.ना./किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, पोअंम/ गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचीन खताल, जयवंत खंडवी यांनी केलेली आहे.

----ooo----